POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-११८ ● मुंबई, रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# राज्य निवडणूक आयोग लागला कामाला



## या जिल्हा परिषद, महापालिकांची नव्याने आरक्षण सोडत

### दोन महापालिकेत आरक्षणाची मर्यादा ही ५० टक्क्यांपेक्षा अधिक

छत्रपती संभाजीनगर तसेच नवी मुंबई महानगरपालिकांच्या निवडणुका अकरा वर्षांपूर्वी झालेल्या असून गेल्या सहा वर्षांपासून या महानगरपालिकांवर प्रशासक आहे, केवळ नागपूर व चंद्रपूर या दोन महानगरपालिकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर जात असल्याने सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका त्यासाठी थांबवून ठेवणे आवश्यक नसल्याने त्वरित सर्व महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली. त्यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी राज्य निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंग यांना याविषयी माहिती विचारली असता त्यांनीही केवळ दोन महानगरपालिकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ही ५० टक्क्यांपेक्षा अधिक जात असल्याचे स्पष्ट केले. त्यावेळी सरन्यायाधीशांनी महानगरपालिकांमध्ये जर केवळ दोन ठिकाणीच आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असेल तर सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका त्यासाठी थांबविणे योग्य नाही असे निरीक्षण नोंदवत त्वरित सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका विनाविलंब जाहीर करण्याचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश दिले. २१ जानेवारी रोजी सुनावणी होईल.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ५० टक्के आरक्षणाची लक्ष्मण रेषा काल सुप्रीम कोर्टाने आखून दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर आता राज्य निवडणूक आयोग कामाला लागला आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषद आणि २ महानगरपालिकांमधील जागांमध्ये यामुळे उलटफेर होतील. जिल्हा परिषद आणि महापालिकांमध्ये लवकरच नव्याने आरक्षण सोडत काढली जाणार आहे. राज्यातील नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका निवडणुकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मयार्दा ओलांडल्याप्रकरणात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. शुक्रवारी न्यायालयाने ५० टक्क्यांची मयार्दा न ओलांडण्याची तंबी दिली होती.

**आरक्षणाच्या लक्ष्मण रेषेसाठी फेरसोडत**

राज्य निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणाची मर्यादा ओलंडता कामा नाही. ही लक्ष्मण रेषा ओलांडली तर या याचिकांच्या निकालाधीन निवडणुका असतील. त्यामुळे त्यावेळी अनेक उमेदवारांना फटका बसू शकतो. या गोष्टी टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने अगोदरच कंबर कसली आहे. राज्यात ज्या ठिकामी ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडण्यात आली आहे. तिथे आता आरक्षणाची फेरसोडत होईल. ओबीसी महिला आणि सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. ही सर्व प्रक्रिया येत्या १५ दिवसांमध्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा**

महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुनावणी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयासमोर पार पडली सरन्यायाधीश सूर्यकांत व न्यायमूर्ती बागची यांच्या खंडपीठाने राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या निवडणुका त्वरित जाहीर करण्याचे निर्देश दिले तसेच नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरू ठेवण्याचे निर्देश दिले.

ज्या ५७ नगरपालिका व नगरपंचायतीमध्ये आरक्षण हे ५० टक्क्यांपेक्षा अधिक गेले आहे त्यांची निवडणूक याचिकेत पारित होणाऱ्या निकालावर अवलंबून राहील. जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्याच्या निवडणुकीत ज्या ठिकाणी ५०% पेक्षा आरक्षणाची मर्यादा ओलांडलेली नाही त्या ठिकाणी निवडणुका जाहीर कराव्या लागतील तसेच या ठिकाणी ही मर्यादा ओलांडली आहे त्या ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा पाळून राज्य निवडणूक आयोगाला निवडणुका जाहीर करण्याचा पर्याय राहील. ज्येष्ठ वकील बलवीर सिंग यांनी राज्य निवडणूक आयोगातर्फे सर्वोच्च न्यायालयास अशी माहिती दिली की सुरू असलेल्या निवडणूक कार्यक्रमांमध्ये ४० नगरपालिका व १७ नगरपंचायतीमध्ये आरक्षणाची ५०% ची मर्यादा ओलांडल्या गेली असून इतर ठिकाणी ती ओलांडल्या गेलेली नाही तसेच अद्याप जिल्हा परिषदा पंचायत समिती व महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला नाही. ज्येष्ठ वकील विकास सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की यापूर्वीच तीन सदस्य खंडपीठाने ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडता येणार नाही असा निर्णय विकास किशनराव गवळी यांच्या प्रकरणात दिला असून के. कृष्णमूर्ती या प्रकरणातील घटना पिठाच्या निर्णयाने ५० टक्क्यांच्या आरक्षणाची मर्यादा ओलांडता येणार नाही असे स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकांचा कार्यक्रम पुढे नाव याचा असेल तर ५० टक्क्यांच्या आरक्षणाची मयार्दा पाळावी लागेल तोपर्यंत कोणताही निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यास राज्य निवडणूक आयोगास मनाई करण्यात यावी. ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी ओबीसींच्या आरक्षण कमी होत असल्याने व बंठीया कमिशनचा अहवाल मान्य नसल्याचे सांगत आरक्षण २७% तसेच ठेवण्यात यावे असा युक्तिवाद केला.

### या ठिकाणी आरक्षणाची लक्ष्मण रेषा ओलांडली

- नंदुरबार १०० टक्के
- पालघर ९३ टक्के
- गडचिरोली ७८ टक्के
- नाशिक ७१ टक्के
- धुळे ७३ टक्के
- अमरावती ६६ टक्के
- चंद्रपूर ६३ टक्के
- यवतमाळ ५९ टक्के
- अकोला ५८ टक्के
- नागपूर ५७ टक्के
- ठाणे ५७ टक्के
- वाशिम ५६ टक्के
- नांदेड ५६ टक्के
- हिंगोली ५४ टक्के
- वर्धा ५४ टक्के
- जळगाव ५४ टक्के
- भंडारा ५२ टक्के
- लातूर ५२ टक्के
- बुलढाणा ५२ टक्के

## शहरातील हवा असुरक्षितच, देशात कोणतं शहर सर्वाधिक प्रदूषित?

मुंबईः राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहरातील हवा अजूनही असुरक्षित असल्याचं समोर आलं आहे. 'क्लायमेट ट्रेंड्स'ने केलेल्या विश्लेषणानुसार, सन २०१५ ते २०२५ या गेल्या १० वर्षांमध्ये देशातील कोणत्याही शहराची हवा गुणवत्ता मानकांपेक्षा चांगली नसल्याचं स्पष्ट झालं आहे. मुंबई, कोलकाता आणि चेन्नई यांसारख्या शहरांचा सरासरी निदेर्शांक मध्यम असला तरी तो निर्धारित मानकांपेक्षा अधिकच राहिला आहे. दिल्ली आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये थंडी वाढताच प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होतो, पण न्यायालयीन हस्तक्षेपानंतरही या समस्येची तीव्रता कमी झालेली नाही. त्यामुळे हवा प्रदूषणाच्या दृष्टीने कोणतेही शहर सुरक्षित नसल्याचं वास्त पुन्हा एकदा उघड झालं आहे. दिल्ली शहरात २०१६ साली हवेचा सरासरी गुणवत्ता निदेर्शांक २५० होता, जो २०२५च्या नोव्हेंबरपर्यंत १८० पर्यंत खाली आला. कार्बन उत्सर्जन, औद्योगिक प्रदूषण आणि भौगोलिक घटक दिल्लीतील प्रदूषणावर परिणाम करत असतात. लखनऊ, वाराणसी, अहमदाबाद आणि पुण्यातही प्रदूषणाचा निदेर्शांक सातत्याने वाढत असून लखनऊ व वाराणसीचा निदेर्शांक 'वाईट' श्रेणीत, म्हणजे २०० च्या पुढे आहे. याउलट, मुंबईचा निदेर्शांक मध्यम श्रेणीत राहिला. कोलकाता आणि चेन्नईसारख्या दक्षिणेकडील शहरांमध्ये उत्तरेकडील शहरांच्या तुलनेत प्रदूषण कमी असलं तरी, तेथील हवेची गुणवत्ताही सुरक्षित मानली जात नाही. बंगळुरू शहरात सर्वात कमी प्रदूषण नोंदवलं गेलं आहे. तिथे हवेचा निदेर्शांक ६५ ते ९० दरम्यान राहिला.

# २९, ३० नोव्हेंबर रोजी देशावर मोठं संकट

## आयएमडीकडून हाय अलर्ट, उत्तर वायव्येकडून...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यासह देशातील वातावरणात बदल होताना दिसत आहे. त्यामध्येच मोठ्या चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला. काही दिवसांपूर्वी गारठा जाणवत होता. मात्र, चक्रीवादळामुळे पुन्हा एकदा देशात पावसाचा इशारा जारी करण्यात आला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, चक्रीवादळामुळे पुन्हा एकदा देशातील वातावरणात बदल होईल. अनेक भागात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ सध्या श्रीलंकेच्या किनाऱ्यावर आणि लगतच्या बंगालच्या उपसागरावर आहे. पुढील २४ ते ४८ तासांत ते भारतात धडकण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर देशातील अनेक भागांमध्ये मोठा इशारा जारी करण्यात आला. तामिळनाडू, आंध्र प्रदेशमध्ये या वादळाचा फटका बसल्याची शक्यता आहे.

देशाच्या काही भागात जरी पावसाचा इशारा देण्यात आला असला तरीही राज्यात हुडहुडी बघायला मिळेल. राज्यात २ ते 3 डिसेंबरपर्यंत थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. मागील दोन चार दिवसांपासून मुंबई पुन्हा थंडी जाणवत आहे. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी भंडाऱ्यात राज्यातील निचांकी तापमानाची नोंद झाली. भंडाऱ्यात १० अंश तापमान होते. हिटवाह चक्रीवादळाचा परिणाम राज्यातील काही भागात बघायला मिळेल. राज्यात ढगाळ वातावरण असेल. विदर्भातील काही भागात हलक्या पावसाचा अंदाज आहे.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, श्रीलंकेच्या किनारपट्टी आणि नैऋत्य बंगालच्या उपसागरावर तयार झालेले गेल्या सहा तासांत ४ किमी प्रतितास वेगाने उत्तर वायव्येकडे सरकत आहे. शुक्रवारी २८ नोव्हेंबर दुपारी हे वादळ श्रीलंकेतील त्रिंकोमालीपासून सुमारे ३० किमी नैऋत्येस, ८.४ उत्तर रेखांश आणि ८१.०° पूर्व अक्षांशावर होते. दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार होईल. दरम्यान, उत्तर भारतासह देशाच्या अनेक भागात तीव्र थंडी पडत आहे.





२९ ते ३० नोव्हेंबरदरम्यान तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये मुसळधार पावसाचा इशारा आहे. २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान आंध्र प्रदेश आणि रायलसीमाच्या किनारी भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा आहे. यादरम्यान जोरात वारे देखील वाहिल. कोकण किनारपट्टीवर देखील पावसाचा अंदाज आहे. नोव्हेंबर महिन्यात कधी पाऊस तर कधी गारठा बघायला मिळत आहे. सकाळी गारठा जाणवत आहे.

# ठेकेदाराच्या नावे १११ कोटींची अनामत रक्कम लाटण्याचा डाव फसला, माजी नगराध्यक्षाला बेड्या

**■वाडा। प्रतिनिधी,**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जव्हार कार्यालयात तब्बल १११ कोटी ६३ लाख रुपयांची सुरक्षा अनामत रक्कम बँकेतून काढण्याचा मोठा डाव अखेर बँक कर्मचाऱ्याच्या जागरूकतेमुळे फसला आहे. ओवी कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराच्या नावाने रक्कम हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असताना बँकेला संशय आला आणि तातडीने चौकशी केली असता हा कथित घोटाळा उघडकीस आला.




स्टेट बँक ऑफ इंडिया, जव्हार शाखेत हा चेक जमा झाला होता. मात्र इतक्या प्रचंड रकमेसाठी डिमांड ड्राफ्ट काढण्याचा प्रयत्न होत असल्याचे पाहून बँक कर्मचाऱ्यांना संशय आला. त्यांनी तत्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधून पडताळणी केली. चौकशीअंती पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांनी असा चेक दिल्याचे नाकारले आणि कोणताही डीडी काढू नये असे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर बँकेने तातडीने व्यवहार थांबवला.

या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून ओवी कन्स्ट्रक्शनचे संचालक आणि जिजाऊ संघटनेचे नेते, तसेच विक्रमगड नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष निलेश (पिंका) पडवळे यांना पालघर पोलिसांनी ठाणे येथून अटक केली आहे. या संपूर्ण प्रकरणात पीडब्ल्यूडी मधील काही अधिकारी आणि कर्मचारी ठेकेदारासोबत संगनमत करून सरकारला कोट्यवधी रुपयांचा तोटा पोहोचवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आहे.

पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी या गैरप्रकाराची चौकशी सुरू असल्याचे सांगितले. प्रकरण गंभीर असल्याने सर्व आर्थिक कागदपत्रे आणि संबंधित खात्यांची तपासणी पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, विक्रमगडचे भाजप आमदार हरिश्चंद्र भोये यांनी हा मुद्दा आगामी हिवाळी अधिवेशनात उचलून धरला जाईल, तसेच पीडब्ल्यूडी मधील मागील काळातील सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी व्हावी, अशी मागणी करणार असल्याचे स्पष्ट केले.

### पीडब्ल्यूडीमधील अनामत रकमेच्या व्यवहारावर प्रश्नचिन्ह

जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर ठेकेदारांमार्फत कामे केली जातात. या कामांवरून १ ते ५ टक्क्यांपर्यंत सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून मोठ्या रकमा विभागाकडे जमा होतात. नियमानुसार ही रक्कम तीन वर्षांपर्यंत काढता येत नाही. ठेकेदार बदलणे, एजन्सी व प्रत्यक्ष काम करणारे वेगळे असणे अशा कारणांमुळे या रकमा अनेक वर्षे न उचलता शिल्लक राहतात. याच जमा रकमेचा गैरफायदा घेत, विभागातील काही कर्मचारी आणि संबंधित ठेकेदारांनी १११ कोटी ६३ लाख रुपयांचा डीडी काढण्याचा कट रचल्याचा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. विभागातील एका कर्मचाऱ्याने बँकेत चेक जमा करून मोठी रक्कम हस्तांतरित करण्याची कारवाई सुरू केली होती. मात्र बँक अधिकारी प्रत्यक्ष ढहऊकार्यालयात पोहोचले आणि विचारणा केली असता हा चेक अधिकृत नसल्याचे स्पष्ट झाले. यामुळे हा गंभीर गैरप्रकार उघडकीस आला.

## जानेवारीत अवघड, फेब्रुवारीत बोर्डाच्या परीक्षा

# पालिका निवडणुका कोणत्या महिन्यात?



**■मुंबई। प्रतिनिधी,**

सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश दिले असले तरी त्यास मुदतवाढ मिळावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या हालचाली सुरु आहेत. राज्यात फेब्रुवारीमध्ये बारावीच्या तर त्यानंतर दहावीच्या परीक्षांना सुरुवात होत असल्याने त्याआधी निवडणुका व्हाव्यात, यासाठी आयोग प्रयत्नशील असून, महापालिका निवडणुका कोणत्या महिन्यात होणार, याबाबत अंदाज वर्तवण्यात आला आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका अशी नावलौकिक असलेली बीएमसी निवडणूक कधी होणार, याकडे सर्वसामान्यांसह राजकीय वतुर्ळाचेही लक्ष लागून राहिले आहे.

**निवडणुकीचा मार्ग मोकळा**

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या निदेर्शानुसार ५० टक्के आरक्षणमयार्देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. परंतु, या सर्व न्यायालयीन प्रक्रियेत निवडणुकांचा कार्यक्रम दोन आठवडे मागे पडला आहे. त्यातच महापालिकांमध्ये मतदारयाद्यांचा कार्यक्रमही घोषित केला असून, २३ डिसेंबर रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याआधी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेणे गरजेचे असल्याने महापालिका निवडणुका किंचित लांबणीवर टाकावी लागण्याचे संकेत आहेत.

**दहावी-बारावीच्या परीक्षांपूर्वी निवडणुकांचे संकेत**

दुसरीकडे, राज्यात बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरुवात होत असून, त्याआधी निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर दहावीच्याही परीक्षांना सुरुवात होणार असून, त्यानंतर निवडणुका घ्यायच्या असल्यास त्या थेट एप्रिल किंवा मेपर्यंत पुढे जाण्याचा धोका आहे. त्यामुळेच या सर्व परिस्थितीचा विचार करता निवडणुका घेण्यासाठी एक ते कमाल दोन आठवड्यांची मुदतवाढ मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करण्याचा विचार आयोगाकडून करण्यात येत आहे. त्यानुसार महापालिका निवडणुका फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस होण्याची दाट शक्यता आहे.

सुनावण्यांमुळे निवडणूक कार्यक्रमाला आधीच दोन आठवडे उशीर झाला असून, तो पूर्ण व्हावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली कालमयार्दा वाढवून मिळावी, अशी प्राथमिक चर्चा सुरू असल्याचे आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# पुण्याती निवडणुकीआधीच कुख्यात गुंड जेलबाहेर!

## पोलिसांनी त्याला घातलीये 'ही' अट, पुण्यात नेमकं चाललंय तरी काय?



### नेमकं हे प्रकरण काय?

गजा मारणेशी संबंधित आयटी अभियंता मारहाण प्रकरण हे 2025 च्या फेब्रुवारी महिन्यात घडले आहे. हे प्रकरण शिवजयंती मिरवणुकीदरम्यान रस्त्यातील वाहतुककोंडीमुळे सुरू झालेल्या वादातून घडलं. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी कोथरूड भागात शिवजयंती मिरवणुकीमुळे वाहतुककोंडी झाली होती. यात आयटी अभियंता देवेंद्र जोग यांच्या कारला मिरवणुकीतील एका वाहनाने धडक दिली. यानंतर वाद वाढला आणि गजानन मारणे व त्याच्या टोळीतील सदस्यांनी जोग यांना मारहाण केली. या घटनेत जोग गंभीर जखमी झाले.

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील कुख्यात गुंड गजा मारणे ऐन पालिका निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा जेलबाहेर आला आहे. शुक्रवारी त्याला विशेष मोक्का न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. कोथरूडमधील एका आयटी इंजिनियरला मारहाण प्रकरणी त्याला मोक्कांतर्गत अटक झाली होती. पण आता त्याला जामीन मिळाला आहे. मात्र पुणे पोलिसांनी त्याला जामीन देताना एक अट घातली आहे. हे नेमकं प्रकरण आहे तरी काय आणि पुणे पोलिसांनीच अट काय आहे पाहूयात.

**...म्हणून मकोका लावला**

या प्रकरणी पुणे पोलिसांनी गजानन मारणे, त्याचा भाचा रूपेश मारणे आणि इतर साथीदारांवर गुन्हा दाखल केला. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी मारणे याला अटक करण्यात आली. या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा म्हणजेच मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली, ज्यामुळे हे प्रकरण अधिक गंभीर बनले. मकोकाचा वापर मारणे टोळीच्या संघटित गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे करण्यात आला.

**आधी फेटाळलाय अर्ज**

मारणेने यापूर्वी जामिनासाठी विशेष मकोका न्यायालयात अर्ज केला होता, पण मे २०२५ मध्ये तो फेटाळण्यात आला. मात्र, आता २७७ दिवसांच्या तुरुंगवासानंतर न्यायालयाने गजा मारणेला जामीन मंजूर केला. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि गुन्हेगारी नियंत्रणावर प्रश्न उपस्थित केले जात आहे.

**२० कोटींच्या खंडणीचा आरोप**

या व्यतिरिक्त, मारणे याच्यावर यापूर्वी २०२२ मध्ये २० कोटी रुपयांच्या खंडणी आणि अपहरण प्रकरणात मकोका लागू करण्यात आला होता. ज्यामुळे मारणेची गुन्हेगारी पार्श्वभूमी स्पष्ट होत असतानाही त्याला निवडणुकीच्या तोंडावर जामीन देण्यात आल्याने संताप व्यक्त केला जातोय.

**ती अट कोणती ?**

गजा मारणेला जामीन देताना पुणे पोलिसांनी एक अट घतली आहे. ही अट म्हणजे, पुणे मनपाच्या हद्दीत राहता येणार नाही. मारणेला सशर्त जामीन मंजूर झाला असला तरी ऐन इलेक्शनच्या तोंडावरच गजा मारणे सारख्या कुख्यात गुंडाला जामीन कसा मिळाला, अशी चर्चा पुण्याच्या राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

# चप्पलचा पट्टा तुटण्याची छोटीशी गोष्ट

## आधी बकार मागितला मग दोघांची मुंडकी कुऱ्हाडीने उडवली

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. चप्पलच्या पट्ट्यावरुन सुरु झालेला छोटासा वाद इतका वाढला की, दोघांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. इतक्या छोट्याशा कारणावरुन झालेल्या दोन हत्यांमुळे परिसरात तणावाचं वातावरण आहे. या घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. आरोपीला अटक करुन त्याची चौकशी सुरु आहे. ७२ वर्षीय सरगिया बालमुचू आणि त्यांची ६५ वर्षीय पत्नी मुक्ता बालमुचू या दोघांचा मृत्यू झाला. या जोडप्याचा ३१ वर्षीय मुलगा चरण बालमुचूने पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानंतर तपासासाठी पोलिसांची विशेष टीम बनवण्यात आली. झारखंडच्या पश्चिमी सिंहभूम येथील गुआगु गावात ही धक्कादायक घटना घडली. पोलिसांनी सांगितलं की, सरगिया बालमुचू आणि त्यांची पत्नी मुक्ता बालमुचू यांची हत्या शेजारी राहणाऱ्या जंगम बालमुचूने केली. पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. जंगमला त्याच्या चप्पलचा पट्टा तुटलेला दिसला. त्यावरुन तो संतापला. यासाठी त्याने बालमुचू जोडप्याच्या मुलींना जबाबदार धरलं. त्यावरुन दोन्ही कुटुंबांमध्ये वाद सुरु झाला. हळूहळू हा वाद तीव्र होत गेला. पोलिसांनी ही माहिती दिली. वाद सोडवण्यासाठी मागच्या रविवारी पंचायतीची बैठक बोलवण्यात आली. पण वादावर तोडगा निघण्याऐवजी अजून वाढला. बैठकी दरम्यान जंगमने पंचायतीसमोर एक बकरा आणि दारुची मागणी केली. जोडप्याने आपल्या आर्थिक परिस्थितीचा हवाला देत मागणी पूर्ण करण्यात असमर्थता दाखवली. त्यानंतर आरोपी नाराज होऊन बैठकीतून निघून गेला.





संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# समानतेशिवाय विकास अशक्य




**आरक्षण देणं आणि सहभाग वाढवणं हा केवळ धोरण किंवा कार्यक्रम न राहता लोकशाहीमध्ये सर्वच संस्था, प्रशासन, कार्पोरेट, कंपन्या यांना स्वतःमध्ये सामाजिक न्यायाच्या अंगाने स्वतःच 'री-इंजिनिअरिंग' करावे लागेल. ज्याला सोशल इंजिनिअरिंग म्हणता येईल.**

जेव्हा कुटुंबात बाळ जन्माला येते त्या वेळेला ते जगभरामध्ये श्रीमंता घरी, मध्यमवर्गीयाच्या घरी किंवा गरीबा घरी जन्माला येते. ते घर निवडण्याचे स्वातंत्र्य निसर्गाने त्या बाळाला दिलेले नाही. परंतु भारताची मोठी गंमत आहे. भारतात फक्त श्रीमंता घरी, मध्यमवर्गीयाच्या किंवा गरीबा घरी बाळ जन्माला येत नाही, तर ते विशिष्ट जातीत जन्माला येतं. कधी ते उच्च वर्णीयाच्या घरी येतं किंवा ब्राह्मण घरी, क्षत्रिय घरी, वैश्य म्हणजेच व्यापाऱ्याच्या घरी तर कधी सेवा करणाऱ्या इतर मागास जनजाती किंवा उतरंडीच्या खालच्या जातीत कुठल्या तरी घरी जन्माला येतं. याचा चॉईस त्या बाळाला नाही आणि वर उतरंड अशी की ज्याला जिना नाही, खालच्याला वरती जाता येत नाही आणि वरच्याला खाली येता येत नाही. आपल्याकडे परंपरेनुसार बाळ जन्माला आलं की त्याचं नाव ठेवण्याचा समारंभ केला जातो. जेव्हा बालकाचे आई-वडील त्यांनी त्या बाळाच्या भविष्यासाठी पाहिलेल्या स्वप्नाच्या आधारे नाव ठेवतात. नावामध्ये बालकाला स्वप्न देतात. म्हणून अगदी उच्च वणीर्याच्या घरी, बुद्धिवाद्याच्या घरी बाळ जन्माला आलं की त्याचं नाव 'प्रद्युम्न' बुद्धीशी निगडित ठेवलं जातात. व्यापाऱ्या घरी पोर जन्माला आलं की सोने, चांदी, रुपे याच्याशी निगडित रूपचंद, धनकेश्वर असे नाव ठेवले जाते. दुसऱ्याच्या खिशातला पैसा आपल्या खिशात आला पाहिजे. क्षत्रियाच्या पोटी बाळ जन्माला आलं की शिवेंद्रसिंह, वीरेंद्रसिंह, विक्रमसिंह असे सिंह-वाघ दहशत निर्माण करणारे ठेवले जाते आणि मग इतर खालच्या जातीत बाळ जन्माला येते तेव्हा रोहिदास, सूरदास, केरू, कचरू अशी नावे ठेवली जातात. या नावांमुळेच त्याचा आत्मविश्वास डळमळीत होतो. आपण गुलाम असल्याची भावना लहानपणीच बळावायला लागते आणि अशी नावे एकाच राज्यात, एकाच देशात, एकच राज्यघटना असणाऱ्या गावात, एकाच शाळेत जाणारी मुलं, अंगणवाडीत जाणारी मुलं देखील वेगवेगळी मानसिक, सामाजिक पार्श्वभूमी घेऊन प्रवेशतात आणि मग तशीच ती लहानाची मोठी होतात. मुळातच या देशांमध्ये भौगोलिक असमानता, भाषिक अभिनिवेष, जातीय पार्श्वभूमी आणि आर्थिक विषमता आहे. हे सगळे पॅकेज आपण आपल्या लेकराला जन्मतःच देत असतो आणि त्यांना जागतिक स्पर्धेमध्ये बरोबरीने जिंका असे मन घडवीत असतो. स्पर्धेची सुरुवात होते ती लाइनच जिथे समानतेची नाही तिथे स्पर्धा बरोबरीत होऊच शकत नाही. अशिक्षित आई, दारुडा बाप, लाइट नसलेली झोपडी, पाच किलोमीटर शाळेत पायी चालत जावं लागतं अशा मूलभूत सुविधा नसलेल्या समाजात शाळेपर्यंत पोहोचण्याची लढाई त्या लेकराला लढावी लागते. ते लेकरू स्कूल बसमधून येणाऱ्या, श्रीमंत घरच्या, शिकल्या सवरलेल्या आई-वडिलांच्या, स्पेशल स्टडीरूम असणाऱ्या लेकरासोबत ही स्पर्धा कशी जिंकणार? म्हणून सांस्कृतिक आत्मविश्वास असण्यापेक्षा जातीय आत्मविश्वास आणि सामाजिक भांडवल काहींना मुळातच वारशामुळे, जातीमुळे आणि वर्णव्यवस्थेमुळे मिळणारच असेल तर स्पर्धा बरोबरीची कशी जिंकता येईल? ज्यांना जी भाषा अवगत आहे, त्यांच्याकडे ते एटिकेट्स आणि कॉमनसेन्स आहे, त्यांचे पालक हे शिक्षित आहेत, ज्यांच्या कुटुंबाला "एनफ्युएंट बॅकग्राऊंड" मिळालेली आहे ते ऑटोमॅटिकली "हाय पोटेन्शिअल्स" वाटणार आणि मग त्यांचं मेरिट नेहमीच उजवं वाटणार. म्हणून भारतात जातीमुळे मिळालेल्या या विशेष सुविधांना मेरिट समजण्याची चूक आपण जोपर्यंत दुरुस्त करणार नाही तोपर्यंत ग्रामीण शाळांमधून येणारी, उच्च जातीत जन्माला न आलेली, पहिल्यांदाच शाळेची पायरी चढणाऱ्या या पिढीला या तथाकथित मेरिटच्या स्पर्धेत खूप मागून सुरुवात करावी लागते हे लक्षात घेतले पाहिजे. आपण त्यांना सांस्कृतिक जाणीव, सुविधांमुळे आत्मविश्वास आणि मेरिट मिळते आहे हे नाकारू नये. पण ज्यांना या सुविधा मिळाल्या नाहीत त्यांना खूप वेगळ्या प्रकारे या मेरिटच्या रेसमध्ये येण्यासाठी लढावे लागते, कष्ट घ्यावे लागतात याची नोंद घेतो आहे आणि त्यांनाही सोबत घेऊन वर जाण्यासाठी काय करावे लागेल याचा सकारात्मक विचार करतो आहे. त्यात आपण त्यांच्यावर उपकार करत नाही. त्यांच्याशिवाय या देशाचा आणि पयार्याने या देशातील लोकांचा म्हणजे सर्वांचाच विकास शक्य नाही. या सर्वांना सोबत घेऊन जाणं, त्यासाठी आरक्षण मान्य करणे म्हणजे फक्त आकडे वाढवणं असं नाही. म्हणजे ते फक्त आहेत, त्यांचं अस्तित्व मान्य करणे पुरेसं नाही तर सत्ता आणि निर्णयाच्या प्रक्रियेत बरोबरी द्यावी लागेल. केवळ सरकारी धोरण आहे म्हणून स्त्रिया, वंचित घटक, मागास जनजाती, आदिवासी, अल्पसंख्यांक यांची केवळ उपस्थिती मान्य करणे पुरेसं नाही. त्यांनाही आयडेंटिटी, स्पेस द्यावा लागेल. निर्णय प्रक्रियेत सामावून घ्यावं लागेल आणि म्हणून या सगळ्यांसाठी फक्त प्रशिक्षण पुरेसं नाही तर मानसिकता, धोरण आणि व्यवस्था याच्यामध्ये आमूलाग्र बदल करावे लागतील. त्यामुळे प्रश्न विचारणं, डिक्टेट करणं, गाजवणं, सुनावणं कमी करून नकोशा वाटणाऱ्या, परंतु या देशाच्या तळागाळातल्या अस्तित्वात असलेल्या पण न पाहिलेल्या, न ऐकलेल्या, असमानता आणि मूकपणे चालणाऱ्या शोषण आणि हिंसेच्या कहाण्या सहनशीलता दाखवून शांतपणे ऐकाव्या लागतील. तरच मोकळ्या मनाने सर्व जाती- धर्माच्या पलीकडे जाऊन करत असलेल्या कामांमध्ये, विकासामध्ये सर्वांचा सहभाग शक्य होईल. आरक्षण देणं आणि सहभाग वाढवणं हा केवळ धोरण किंवा कार्यक्रम न राहता लोकशाहीमध्ये सर्वच संस्था, प्रशासन, कार्पोरेट, कंपन्या यांना स्वतःमध्ये सामाजिक न्यायाच्या अंगाने स्वतःच 'री-इंजिनिअरिंग' करावे लागेल. ज्याला सोशल इंजिनिअरिंग म्हणता येईल आणि म्हणून तू तू, मैं मैं न करता, एकमेकांसमोर राजकीय सुडाची भावना न ठेवता आपण देश म्हणून याचा विचार केला आणि जातीय, सांस्कृतिक वास्तव समजून घेतलं, ऐकण्याची तयारी ठेवली, मागे राहिलेल्या भावा-बहिणींना हात देऊन बरोबरीने घेण्याची तयारी ठेवली तरच समानता सत्यात उतरेल. सतत ही भीती व्यक्त केली जाते की या सगळ्यांना सहभागी करून घेतलं तर त्यामुळे गुणवत्ता कमी होईल हे कितपत खरे आहे? जातीय आणि वर्गीय असमानता असणाऱ्या या समाजामध्ये मूलतःच गुणवत्तेच्या संदर्भात फार मोठे गैरसमज घेऊनच ही भीती व्यक्त करतो. सहभागी करून सर्वांना सामावून घ्यावे असे आपण म्हणतो तेव्हा घालून दिलेल्या कुठल्याही मानदंडामध्ये फरक करा, खालच्या पातळीवर आणा असे आपले म्हणणे नाही. फक्त घालून दिलेल्या तथाकथित टॅलेंटेड शोधन करणाऱ्या आणि शोषित वर्गाच्या मधल्या भिंती पाडा. ती अडथळ्याची शर्यत थांबवा. तिथले अडथळे दूर करा, मग बरोबरीने येऊन स्पर्धा करू द्या. देशातील लाखो गुणवान लोक आपल्या पूर्ण क्षमतेसह हा देश घडवायला पुढे येतील. ज्यांनी गरिबी अनुभवली आहे, ज्यांनी जात सोसली आहे, ज्यांनी लिंग आधारित असमानतेविरुद्ध संघर्ष केला आहे ते इतरांपेक्षा कुठेही कमी नाहीत. फक्त जिथून तुमची लढाई सुरू होते तोच तुमच्याबरोबर स्पर्धा करण्याचा स्टार्टिंग पॉइंट नाही आहे. त्यांच्यासाठीची ही लढाई खूप आधीच त्यांना लढावी लागली, त्यांना खूप कष्ट पडले इथपर्यंत पोहोचायला, ते समजून घेतले पाहिजे. हे जिथे समजून घेतलं जातं तिथं वेगवेगळ्या स्तरावरचा, वेगवेगळ्या जाती-धर्मातल्या, लिंग भेदापलीकडे वेगळ्या भौगोलिक परिस्थितीमधून आलेले भाषिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी घेऊन एकत्र येतात, एकमेकांना समजून घेतात, एकमेकांच्या भूतकाळातील अपयश आणि संघर्ष समजून घेतात, कौतुक करतात, आत्मविश्वास वाढवतात तेव्हा तयार होणारा हा लोकांचा समूह, पिढी जास्त सृजनशील, नावीन्यपूर्ण आणि प्रश्नांकडे येणाऱ्या अडचणींवर वेगळ्या पद्धतीने मात करून यश संपादित करते असे दिसते आहे. अशा पद्धतीचे सांस्कृतिक, सामाजिक वातावरण कार्पोरेटमध्ये प्रशासनात, सरकारमध्ये निर्माण होणे ही भारताची गरज आहे. सर्व घटकांना सामावून घेतल्यामुळे गुणवत्ता तर कमी होतच नाही उलटपक्षी विकासाची गती वाढते आणि यशाच्या उच्च शिखरावर पोहोचता येते. सर्वांचाच आनंद द्विगणित होऊ शकतो. नकारात्मकता संपते. वजाबाकी सोडून दिली पाहिजे आणि म्हणून समानता आणून कोणावर उपकार नाही तर हा संविधानिक अधिकार आहे. म्हणून प्रत्येक नैतिकता आणि पुरोगामी विचार करणाऱ्या संस्था-संघटना आणि व्यक्ती यांची जबाबदारी आहे की जातीय, धार्मिक, भौगोलिक, ग्रामीण, शहरी अशा आपल्यामधील असमानता निर्माण करणाऱ्या भिंती पाडून त्यापलीकडच्या मोकळ्या आकाशाला गवसणी घालण्याची संधी सर्वांना मिळू दे.

# अयोध्येवर भगव्याची शोभा





आजु सफल तपु तीरथ त्यागू,
आजु सफल जप जोग बिरागू,
सफल सकल सुभ साधन साजू,
राम तुम्हहि अवलोकत आजू...

अनेक शतकांपासूनच्या या अंतर्गत भावना प्रत्यक्षात समोर आल्या. तपश्चर्येला फळ मिळाले, मन प्रसन्न झाले, श्रद्धा पूर्ण झाली. श्री अयोध्या धाम येथील श्रीराम जन्मभूमी मंदिरावर झालेला ध्वजारोहण सोहळा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करतो, तसेच भारतीयांची श्रद्धा, देशभक्ती आणि सांस्कृतिक मूल्यांची घोषणा आहे. हा क्षण ऐतिहासिक आहे. दीर्घकाळापासून जपलेला संकल्प आता प्रत्यक्ष वास्तुकलेत रूपांतरित झाला. लाखो भक्तांचे स्वप्न आज पूर्ण झाले. ज्यात तपश्चर्या, त्यागाची भावना सामावलेली आहे.

इतिहासात अनेक संघर्ष, साम्राज्यांचे उदय, तसेच साम्राज्ये लोप पावली. श्रीरामाच्या जन्मस्थानासाठी केलेला प्रयत्न न्यायासाठी असण्यासोबत देशाच्या अस्मितेला पुन्हा जागृत करण्यासाठी होता. या शतकानुशतके चाललेल्या प्रयत्न ात समाजातील प्रत्येक घटक सामील होता. संन्यासी, संत, पुरोहित, नागा, निहंग, विद्वान, विचारवंत, सामान्य कुटुंब आणि जंगल व गुहांमधील साधक या सर्वांनी जात, पंथ आणि उपासना पद्धतीच्या रेषा ओलांडून स्वतःला प्रभू श्रीरामांच्या चरणी समर्पित केले. अयोध्या धाममध्ये मयार्दा पुरुषोत्तम श्रीरामाच्या या भव्य मंदिरावर झालेल्या ध्वजारोहण सोहळ्यामधून दीर्घकाळ जोपासलेली भक्ती, संयमी संघर्ष आणि सामूहिक श्रद्धा दिसून येते. विवाह पंचमीचा हा दैवी योग या उत्सवाला आणखी पवित्र करतो. श्रीराम आणि माता जानकी यांचा विवाह झालेला मार्गशीर्ष शुद्ध पंचमी हा दिवस विवाह सोहळा आणि धर्म व निसर्गाच्या समन्वयाचे प्रतीक आहे. हा ध्वजारोहण सोहळा परंपरेला प्रबळ करतो आणि कालातीत संदेश देतो की धमार्चा नेहमी विजयी होतो आणि रामराज्याची तत्त्वे कायम टिकून राहतात. महर्षी वाल्मिकींनी रामायणात म्हटल्याप्रमाणे, 'रामो विग्रहवान धर्म' म्हणजेच प्रभू श्रीराम हे धमार्चे अवतार आहेत. हा ध्वजारोहण फक्त विधी किंवा उत्सव नाही तर ऐतिहासिक टप्पा आहे, जेथे हजारो वर्षांची सांस्कृतिक स्मृती, दशकांपासून न्यायासाठीचा संघर्ष, संतांचे तप, भक्तांचे धैर्य व राष्ट्राचा सामूहिक उत्साह एकत्र येऊन सत्याचा विजय साकारला आहे, धमार्ला नवसंजीवनी दिली आहे आणि प्रभू श्रीरामाच्या जन्मस्थानी भव्य मंदिर उभारले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम लल्लाच्या भव्य प्राणप्रतिष्ठेपासून अयोध्येने जागतिक स्तरावरून अभूतपूर्व लक्ष वेधले आहे. एका वर्षापेक्षा कमी कालावधीत भारत आणि परदेशातून एक कोटीहून अधिक भाविकांनी व पर्यटकांनी अयोध्येला भेट दिली. हॉटेल्स आणि धर्मशाळा पूर्णपणे भरलेल्या आहेत आणि नवीन रोजगार व व्यवसायाच्या संधींच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये जलद वाढ होत आहे. अयोध्या आता श्रद्धेचा आणि आर्थिक विकासाचा सुसंवादी संगम साधत जागतिक सांस्कृतिक राजधानी ठरले. पंतप्रधानांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली अयोध्येची त्रेता युगाप्रमाणे म्हणजेच दिव्य, भव्य आणि अभिनव अशी तुलना केली जात आहे. रस्ते, घाट, मार्ग, सुरक्षा व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यात आला आणि त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ, रामपथ, धर्मपथ, भक्तिपथ, जन्मभूमी पथ आणि सरयू नदीच्या किनाऱ्याचे संवर्धन हे या परिवर्तनाचे आधारस्तंभ बनले आहेत. जवळपास ५०,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांमुळे अयोध्येचा कायापालट होत आहे. मोक्षाचे हे शहर आता जगातील पहिले स्मार्ट आध्यात्मिक शहर म्हणून रूपांतरित केले जात आहे. लवकरच सुरू होणारे म्युझियम ऑन टेम्पल्स अयोध्येच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला जागतिक शिक्षण केंद्रात रूपांतरित करेल. १,४०७ एकर जगेवरील नवीन अयोध्या ग्रीनफिल्ड टाऊनशिपमध्ये २०० एकर हरित जागा, सुपर-स्पेशलिटी आरोग्य केंद्र, भूमिगत उपयुक्तता यंत्रणा आणि वेलनेस हबचा समावेश आहे, जे शहराला भावी स्थिर, पर्यावरणपूरक आध्यात्मिक महानगर म्हणून आकार देत आहे. चाळीस मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प अयोध्येमधील ऊर्जेच्या गरजांची पूर्तता करत आहे. प्रभू श्रीरामाचे व्हर्च्युअल दर्शन, मेटाव्हर्स अनुभव, वैदिक वन आणि हवामान-आधारित व्यवस्थापन यंत्रणा शहराची ओळख अधिक वाढवत आहे. श्रद्धा, संशोधन, संस्कृती, तंत्रज्ञान आणि दूरदर्शी दृष्टिकोन यांना एकत्र करून अयोध्या पवित्र शहर तसेच जागतिक वारसा स्थळ म्हणून देखील उदयास येत आहे. जगातील हा पहिला धार्मिक बांधकाम प्रकल्प आहे, ज्याला ब्रिटिश सेफ्टी कौन्सिलकडून 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' आणि भारताच्या नॅशनल सेफ्टी कॉन्सिलकडून सर्वोच्च सुरक्षा पुरस्कार मिळाला आहे. यामधून निदर्शनास येते की, श्रद्धा आणि भक्तीसोबत जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी आणि सुरक्षा मानकांचे पालन करण्यात आले आहे. मंदिर संकुल २.७ एकर जागेवर पसरलेले आहे, ज्यामध्ये सुमारे ५७,४०० चौरस फुटांचे बांधकाम क्षेत्र आहे. मंदिराची लांबी ३६० फूट, रुंदी २३५ फूट आणि उंची १६१ फूट आहे. या तीन मजली मंदिरात २० फूट उंचीचे मजले, ३६६ बारकाईने कोरीव काम केलेले स्तंभ (खांब), पाच मंडप, १२ भव्य प्रवेशद्वार आणि अतुलनीय कारागिरीची साक्ष देणारी विशिष्ट नागर-शैलीतील वास्तुकला आहे. मंदिराच्या तळमजल्यावर बालकराम यांचे दर्शन मिळते, तर पहिल्या मजल्यावर श्रीराम दरबारचे दिव्य दृश्य पाहायला मिळते. मंदिराच्या तटबंदीमध्ये शेषावतार मंदिर, संत तुळसीदास मंदिर, जटायू आणि खारीचे पुतळे आहेत, तर सप्त मंडपामध्ये महर्षी वसिष्ठ, महर्षी विश्वामित्र, महर्षी वाल्मिकी, अगस्त्य मुनी, निषादराज, माता शबरी आणि माता अहिल्या आहेत. विनासायास आध्यात्मिक अनुभव मिळण्याच्या खात्रीसाठी भक्त-केंद्रित सुविधा काळजीपूर्वक डिझाइन करण्यात आल्या आहेत. प्रभू श्रीरामाचे राज्य धार्मिक आदर्श असण्यासोबत त्यामधून मानवता आणि अनुशासन दिसून येते. राज्याचा आधार न्याय आहे, भीती नाही आणि राष्ट्रासाठी शासक नाही तर जनता महत्त्वाची आहे. रामराज्याची ही भावना आजही समाज, धोरणे आणि देशाच्या चारित्र्याला मार्गदर्शन करत आहे. हे मंदिर फक्त दगडी बांधकाम नाही तर त्यामध्ये भक्तांचे संघर्ष, संतांचे तप आणि समाजाचे समर्पण सामावलेले आहे. अयोध्या आता फक्त तीर्थक्षेत्र राहिलेले नाही, तर उत्साहाचे केंद्र बनले आहे. श्रीराम आता फक्त स्मरणीय नाहीत, तर अनुभव आहेत. भारत आता फक्त राष्ट्र नाही, तर राम-केंद्रित संस्कृतीचे जागृत रूप आहे. प्रभू श्रीराम यांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठता, देशभक्ती, चारित्र्य आणि नीतिमत्ता या आदर्शांपासून प्रेरणा घेत राहिल्यास मानवी संस्कृती अधिक समृद्ध होईल. हे मंदिर भक्तीचे केंद्र असण्यासोबत जीवनाचा दीपस्तंभ आहे, जो भावी पिढ्यांना आठवण करून देतो की धर्म केवळ उपासनेचा विधी नाही, तर आचरणाचा दृष्टिकोन आणि समाजाचा आधार आहे.

# गुटखा विक्री राजरोसपणे सुरूच



गेल्या तेरा वर्षात ना राज्यात गुटखा बंदीची कडक अंमलबजावणी झाली ना त्याची विक्री करणाऱ्यांना कठोर शिक्षा. त्यामुळेच शहरी आणि ग्रामीण भागात सरकारी यंत्रणांच्या नाकावर टिचून राजरोसपणे गुटखा विक्री सुरू आहे. यामुळे कायदा केवळ कागदावरच राहिला आहे.

राज्य सरकारने गुटखा, पान मसाला आणि तंबाखू मिश्रित उत्पादनांची विक्री, साठा आणि वितरण करण्यास प्रतिबंध करणारा कायदा २०१२ मध्ये प्रथम लागू केला. हा कायदा पारित होऊन आता सुमारे तेरा वर्ष लोटली आहेत, परंतु या कायद्याचा हेतू साध्य झालेला दिसत नाही. गुटखा विक्रीला शासकीय खात्यातील अधिकारी कर्मचारी यांचे संरक्षण असल्याने गुटखा बंदीची राज्यात अंमलबजावणी करणे सरकार समोरील मोठे आव्हान आहे. अधिकारी, गुन्हेगार यांच्या टोळ्या कायदा धाब्यावर बसवत असताना त्यांना नेमके कोणाचे संरक्षण आहे. हे ही समोर येणे गरजेचे आहे.

राज्याच्या विधानसभा अधिवेशनात दरवर्षी गुटखा विक्रीचा विषय चचेर्ला येतो. सरकारकडून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले जाते. पण अधिवेशन संपताच हा विषयही तिथेच संपून जातो. राज्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित करने हे विधानसभा, परिषद सदस्यांचे कर्तव्य आहे. मात्र याबाबत प्रशासन कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करत नसेल तर त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार गंभीर नसल्याचे स्पष्ट होते.

आजही मुंबईसारखे शहर असो की ग्रामीण भागातील एखादे गाव. सर्व ठिकाणी गुटखा, पान मसाला आणि तंबाखू मिश्रित उत्पादनांची विक्री खुलेआम सुरू आहे. कोणत्याही पान टपरीवर सहज गुटख्याची पाकिटे मिळत आहेत. विक्रेत्यांना कोणाचीही भीती उरलेली नाही. पोलीस, अन्न व औषध प्रशासनातील कर्मचाऱ्यांच्या आशीवार्दाशिवाय हे सुरू राहणे शक्य नाही.

गुटखा बंदीनंतर राज्यातील गुटखा निर्मितीचे कारखाने बंद झाले. परंतु राज्याच्या आजूबाजूच्या राज्यांमध्ये गुटखा विक्रीवर बंदी नसल्याने बाहेरील राज्यातून रेल्वे, रस्ते मागार्ने गुटखा राज्यात येत आहे. बाहेरील राज्यातून गुटखा चोरट्या मागार्ने येऊन तो शहरांसह राज्याच्या ग्रामीण भागात थेट पोचतो. यात सरकारी सर्व यंत्रणांचे अपयश आहे. राज्यात चोरट्या मागार्ने गुटखा येत असल्याचे सरकार सांगते. मग याचा राज्यात कधी तुटवडा निर्माण झाल्याचे कधी ऐकिवात आलेले नाही. त्यामुळे गुटखा विक्रीचे रॅकेट किती मोठे असेल याची सरकारी यंत्रणांनाच माहिती असावी. या रॅकेटचा कुणी तरी मोठा 'आका' असल्याशिवाय राज्यात खुलेआम गुरखा विक्री सुरू राहणे शक्य नाही.

महाराष्ट्र राज्याच्या आजूबाजूच्या राज्यातून गुटखा येतो असे अन्न व औषध प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात परराज्यातून गुटखा येत असल्यास रेल्वे, महामार्ग पोलिस तितकेच जबाबदार ठरतात. कायदा कितीही चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी करणारे कसे आहेत, यावरून कायद्याचे महत्व अबाधित राहते. मात्र ज्यांच्यावर कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे, तेच कायद्याच्या रक्षणाऐवजी 'कायद्या'साठी काम करत असावेत, म्हणून की काय मुंबईतील रेल्वे स्थानकातील रेल्वे रूळ, रस्ते, पदपथ सर्वत्र गुटखा, पान मसाला खाऊन थुंकणाऱ्यांनी लालेलाल करून ठेवले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यातील ३६५ दुकानांवर कारवाई केली. यामध्ये ३५४ दुकानांमध्ये गुटखा, पान मसाला अशी प्रतिबंधीत उत्पादने आढळली. या कारवाईत २२ कोटी १७ लाख ८९ हजार ९१४ रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला. राज्यात लाखोंच्या संख्येने पान टपऱ्या, दुकाने असतील. मात्र या तुलनेत राज्यातील दुकानांमध्ये झालेली कारवाई किरकोळ ठरते. अन्न व औषध प्रशासन गुटखा बंदीची अंमलबजावणी करते. मात्र या खात्याकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. आहे तो कर्मचारी वर्ग इतर कामांमध्ये व्यस्त असल्याने गुटखा विक्रीला कोणीही गांभीयार्ने घेत नसल्याचेही चित्र आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि शिक्षण संस्थांच्या परिसरातील वातावरण सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारने सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा २००३ मध्ये केला आहे. या कायद्यानुसार कोणतीही शाळा, महाविद्यालय किंवा शिक्षण संस्थेच्या परिसरात १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी आहे. यानंतर २०१२ मध्ये सरकारने गुटखा बंदीचा कायदा केला. परंतु या कायद्यांचे उल्लंघन सर्वत्र होत आहे. शाळा, महाविद्यालय परिसरात अनेक टपऱ्या दिसून येतात. कायद्यांचे उल्लंघन होत असल्याने तो कागदावरच अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत आहे.

राज्यात गुटखा व पान मसालाजन्य पदाथार्ची वाहतूक व विक्री रोजरोजपणे सुरु आहे. काही गुन्हेगार पोलीस संरक्षणात हा व्यवसाय करत असावेत. यामध्ये एफडीए, पोलीस आणि आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचा खळबळजनक आरोप विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत केला होता. गुटखा तस्करीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे आश्वासन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले होते. त्यानुसार कायद्यातील सुधारणांचा प्रशासन विचार करत आहे.

कायद्यामध्ये काही पळवाटा असल्यास जनतेच्या हितासाठी कायदा आणखी कठोर व्हायला हवा. मात्र कायदा कठोर करताना यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीत कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांचाही समावेश होणे गरजेचे आहे, अन्यथा जो पकडला तो चोर अशी दिखाऊ कारवाई होऊन कायद्याच्या अंमलबजावणीकडे सोईस्कर दुर्लक्ष करणारे मात्र मोकाट राहतील.

# वंशाचे दिवे विझताना...



महाराष्ट्रात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असल्याने उमेदवारांची अडवाअडवी-पळवापळवी, कार्यकर्त्यांच्या हाणामाऱ्या आणि कोट्यवधींच्या रोख रकमेच्या पकडापकडीला नुसता ऊत आला आहे. या गदारोळात आपल्या चिमुकल्यांच्या देहत्यागाकडे किती संवेदनशील मनांचं लक्ष असेल, कुणास ठाऊक? गेला आठवडाभर शाळकरी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचं सत्र सुरूच आहे. कारणं वेगवेगळी आहेत, ठिकाणं वेगवेगळी आहेत. पण, या कोवळ्या जीवांना जगण्याचा ताण सोसेनासा झाला आहे. ज्यांनी जन्म दिला, त्यांच्या पिढीने हे जग इतकं क्रूर केलं आहे की, या जगात उमलण्यासाठी त्यांचं मन धजावेनासं झालं आहे. अनावश्यक ताणतणावांचं ओझं घेऊन जगण्यापेक्षा या जगातून स्वतःहूनच गेलेलं बरं, या जाणिवेने हे चिमुकले मोठ्या धैयार्ने आपलं जीवन संपवत आहेत. कोणी मेट्रोखाली जीव दिला आहे, तर कोणी गळफास घेतला आहे; कोणी शाळेच्या इमारतीवरून उडी मारली आहे, तर कुणाला शाळेने दिलेली शारीरिक शिक्षा इतकी असह्य झाली की, त्यातच तिचं प्राणोत्क्रमण झालं आहे. ही सगळी उदाहरणं महाराष्ट्र किंवा महाराष्ट्राशी संबंधित आहेत. पण, इथे महाराष्ट्राचा अपवाद नाही. हे देशभर घडतं आहे. पण, त्याकडे 'राष्ट्रीय समस्या' म्हणून पाहावं, कारणांच्या खोलात जावं, असं कुणालाही वाटलेलं दिसत नाही. तशा बातम्या ना वाचायला मिळाल्या, ना प्रसिद्ध करायला मिळाल्या! जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात २०१७ मध्ये आत्महत्यांचं प्रमाण एक लाख लोकसंख्येमागे ९.९ होतं. ते आता १२.४ पर्यंत पोहोचलं आहे. दुदैर्वाची बाब अशी की, या वाढीला विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचंच प्रमाण कारणीभूत आहे. भारतात गेल्या वर्षात तब्बल १४ हजार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालातील आकडेवारी पाहिली, तर २०२३ मध्ये देशात १३ हजार ८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचं दिसतं. २०१९ च्या तुलनेत २०२३ मध्ये ही वाढ ३४ टक्के आहे. गेल्या दशकात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांत ६५ टक्क्यांची भयानक वाढ आहे! विद्यार्थ्यांच्या आत्महत्या म्हटलं की, दोषदिग्दर्शनाची सुरुवात नेहमी शिक्षण आणि परीक्षांपासूनच सुरू होते. परीक्षेतील अपयश, अपयशाची भीती आणि त्यातून येणारं नैराश्य हेच विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत आहे, असं मानून मध्यंतरी आठवीपर्यंतच्या सर्व परीक्षा रद्द केल्या होत्या. कुणालाच नापास करायचं नाही, असं शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी ठरवून टाकलं होतं. त्यानंतरच्या परीक्षांची काठिण्य पातळी खाली आणण्यात आली. १०० पैकी १०० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यामुळे रीघ लागली. प्रत्यक्ष परीक्षेऐवजी त्यांच्या विषय शिक्षकांना गुणांची खैरात करण्याची मुभा देण्यात आली. मुलं नापास व्हायची जवळजवळ थांबली. 'जवळजवळ' म्हणण्याचं कारण असं, की एवढं करूनही काही मुलं नापास झालीच. त्यांच्यासाठी आता विषयांचे गट करून त्यात कमीतकमी एकत्रित गुण मिळाले, तरी उत्तीर्ण करण्याची सुविधा येते आहे. याने फक्त शिक्षणाचा दर्जा घसरतो आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या कायम आहेत! या आत्महत्यांमध्ये अभ्यासक्रम न झेपणं किंवा परीक्षेचं दडपण हे मुद्दे आहेत, पण त्याचं प्रमाण अगदी कमी आहे. अशा मुलांची विद्यालय-महाविद्यालयांतील उपस्थिती एकदा तपासली पाहिजे. विद्यार्थी उपस्थितच राहात नसेल, तर त्यासाठी अभ्यासक्रम किंवा परीक्षांना कसा दोष देता येईल? त्यामागे अन्य कारणं असू शकतात. ती शोधून दोष तिथे दिला पाहिजे. तिथे उपाययोजना केली पाहिजे.

# मुलांना द्या व्यावहारिक ज्ञान



**मुलांचे भावी आयुष्य सुखी आणि समाधानी व्हावे यासाठी सगळेच पालक मुलांना उत्तम शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असतात, पण यशस्वी होण्यासाठी फक्त शिक्षण पुरेसे नसून त्याबरोबर इतर ५ गोष्टींचेही ज्ञान मुलांना असणे आवश्यक असते.**

### पैशांचे महत्त्व

पालकांकडे कितीही पैसे असले तरी मुलांना त्याचे महत्त्व नसते. कारण आपल्याकडे भरपूर पैसे आहेत हे पालक जेव्हा मुलांना दाखवत असतात त्यावेळी मुलांना पैसा कमावण्याची इच्छा राहत नाही. सगळेच पैशाने सहज मिळत असल्याने मुलं वायफळ पैसा उडवतात. त्यामुळे पैसा कमावण्यासाठी किती कष्ट करावे लागतात याबद्दल मुलांशी पालकांनी बोलावे.

### माफी मागणे

मुलांना वाढवताना शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञान देणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने हातून चूक झाल्यावर समोरच्या व्यक्तीची माफी मागणे किती गरजेचे आहे हे सगळ्यात आधी मुलांना शिकवावे. कारण अनेक पालक प्रेमापोटी मुलांच्या लहान सहान चुकांकडे दुर्लक्ष करतात. . त्यामुळे आपण कुठे चुकलोय किंवा चुकतोय हेच मुलांना कळत नाही. आपण गुड बॉय, गुड गर्ल, परफेक्ट असल्याचा गैरसमज त्यांच्यात निर्माण होतो. हाच ग्रह मनाशी पक्का करून ही मुलं जेव्हा बाहेरच्या जगात जातात, तेव्हा काय चूक काय बरोबर हेच त्यांना कळत नाही. यामुळे चुकल्यावर माफी का मागायची याच अहंभावात ही मुलं वावरतात. त्यामुळे त्यांच्यात हेकेखोरपणा वाढतो. आपलं तेच खरं करण्याची वृत्ती वाढीस लागते.

### कौतुक करणे

दुसऱ्या मुलाने चांगले काम केल्यावर त्याचे कौतुक करण्याबद्दल मुलांना शिकवावे. त्यामुळे त्यांच्यात दुसऱ्याप्रती मत्सर निर्माण होणार नाही. आपल्यापेक्षाही हुशार मुलं किंवा व्यक्ती जगात आहेत याचा ते स्वीकार करतील.

### दुसऱ्यांचा सन्मान

बऱ्याचवेळा हे पहावयास मिळतं की मुलं घरातील मोठ्यांचा आदर सन्मान करतात, पण बाहेरील मोठ्यांचा आदर करत नाहीत. त्यामुळे पालकांनी मुलांना मोठ्यांचा आदर करणे शिकवावे.

### वेळेचे महत्त्व

जीवनात यशस्वी होण्यासाठी वेळेच महत्त्व समजणं फार महत्त्वाचे असते. त्यामुळे मुलांना वेळेचे महत्त्व समजवून सांगावे. त्यामुळे मुलं त्यांचा वेळ निरुपयोगी कामात घालवणार नाहीत. वेळेवर उठणे, वेळेवर झोपणे आणि वेळेवर काम करण्याचे महत्त्व त्यांना कळेल. ज्याचा फायदा त्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी होईल.

# संडे हो या मंडे, किती खावीत अंडी?



- निरोगी व्यक्तीने दररोज एक अंड्याचे सेवन केले पाहिजे.
- तज्ज्ञांच्या मते निरोगी व्यक्ती दररोज ३ अंडी खाऊ शकते. यापेक्षा जास्त अंडी खाणे टाळा.
- शरीराला आवश्यक प्रथिनांचा पुरवठा करणारा एक घटक म्हणून अंड्यांकडे पाहिले जाते.
- एका अंड्यामध्ये व्हिटॅमिन बी१२, व्हिटॅमिन डी, सेलेनियम, आयोडिन आणि व्हिटॅमिन बी२ हे घटक असतात, ज्यांचा शरीरावर सकारात्मक परिणाम होतो.
- शरीर सुदृढ ठेवण्यासाठी महत्त्वाचे असणारे फोलेट, कोलीन आणि लोह असे महत्वाचे घटक अंड्यामध्ये असतात.
- महिलांनीदेखील अंडीचे सेवन केले पाहिजे. एका संशोधनात असे आढळले आहे की, दररोज एक अंडे खाल्ल्याने महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरचा धोका कमी होतो, पण अंड्याचे अति सेवन तुम्हाला धोक्यात टाकू शकते. त्यामुळे शरीरात आहारातील या घटकाचाही नियंत्रित पुरवठा करणे आवश्यक आहे.



# पिंपल्स हटाव!

**तरुणांमध्ये हल्ली मुरुमांची समस्या अधिक आढळून येते. व्यस्त जीवनशैलीमुळे खाण्या-पिण्याच्या बदलत्या सवयीमुळे चेहऱ्यावर मुरुमे येतात. यासाठी बाजारात अनेक केमिकलयुक्त उत्पादने असतात, मात्र त्यांचा परिणाम हा कायमस्वरुपी नसतो. यामुळे मुरुमे घालवण्यासाठी तुम्ही खालील उपाय करू शकता.**


- **बर्फ थेरपी** चेहऱ्यावर मुरुमे आल्यास त्यावर बर्फ लावणे उत्तम मानले जाते. यामुळे मुरुमांचा लालसरपणा कमी होतो. तसेच सूजही कमी होते. बर्फ लावल्याने मुरुमे कमी होण्यास मदत होते. कपड्यामध्ये बर्फ घेऊन तो मुरुमांच्या जागी काही वेळ ठेवा. ही प्रक्रिया दिवसभरात २-३ वेळा करा.
- **स्टीम** चेहऱ्यावर चमक हवी असल्यास स्टीम घेणे गरजेचे आहे. यामुळे केवळ चेहऱ्यावरील घाण दूर होत नाही, तर त्वचा मुलायम होण्यास मदत होते. स्टीममुळे रोमछिद्रे खुली होतात. यामुळे त्वचा श्वास घेऊ शकते.
- **लसूण** लसणामध्ये अँटी व्हायरल, अँटी फंगल तसेच अँटी सेप्टिक आणि अँटी ऑक्सिडंट्ससारखे गुणधर्म असल्याने मुरुमांवर लसूण गुणकारी ठरतो. यातील सल्फर त्वचेसाठी लाभदायक असतात. लसूण सोलून त्याची पेस्ट करून मुरुमांवर लावा. पाच ते सात मिनिटे लावून चेहरा कोमट पाण्याने धुवा.

# हिवाळ्यासाठी वेगन हेअर मास्क

**हिवाळ्यात केस ड्राय आणि निर्जीव होतात. त्यामुळे कोंड्याची समस्याही वाढते. तसेच हिवाळ्यातल्या थंड वाऱ्यामुळे टाळूचा ओलावा नाहीसा होतो. यासोबतच आपण थंडीत कानटोप्या किंवा शॉल वापरतो. यामुळे आपल्या केसांना किंवा टाळूला लोकरीचा त्रास होऊ शकतो. म्हणूनच हिवाळ्यात केसांची जास्त काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी योग्य हेअर मास्क वापरणे योग्य ठरेल. हेअर मास्क केसांना केवळ पोषण देत नाहीत, तर केसांना रेशमी आणि चमकदार ठेवायलादेखील मदत करतात. अशातच केसांसाठी तुम्ही घरी वेगन हेअर मास्क बनवू शकता आणि हा हेअर मास्क तुम्ही थंडीत केसांना लावू शकता.**

जर थंडीच्या दिवसात तुमचे केस कोरडे आणि निर्जीव दिसत असतील, तर केळी आणि बदामाच्या तेलाने घरच्या घरी वेगन मास्क तुम्ही बनवू शकता. तसेच केळी केसांना मॉईश्चरायझ करतात आणि मऊसुद्धा ठेवतात. यासोबतच बदाम तेल हे केसांना कंडिशनिंग करण्यास चांगली मदत करतात. जर तुमचे केस खूप खराब झाले असतील, तर तुम्ही या मास्कमध्ये एक चमचा एलोवेरा जेलदेखील घालू शकता. आता आपण पाहुयात वेगन हेअर मास्क कसा बनवायचा.





## केळी आणि बदाम तेलाने मास्क बनवा


**साहित्य** १ पिकलेले केळे
२ चमचे बदाम तेल

**कृती** सर्वप्रथम चमच्याच्या मदतीने केळी मॅश करा. आता त्यात बदामाचे तेल मिसळा. ही पेस्ट लावताना केस दोन्ही बाजूला करून घ्या. यानंतर हळुवारपणे ही पेस्ट सगळ्या केसाला लावून घ्या.
तसेच ही पेस्ट २० मिनिटे अशीच राहू द्या.
पेस्ट लावून झाल्यानंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ करा आणि नंतर केसांना सॉफ्ट शॅम्पू लावा. यानंतर केस चांगले धुवून घ्या.

**Lifestyle**

# परफ्युमचे साईड इफेक्ट्स

**अंगावर, कपड्यांवर परफ्युम शिंपडले की त्याच्या सुगंधानेच मूड फ्रेश होतो. वातावरण सकारात्मक होते. यामुळे आपण दिवसभर मन प्रसन्न ठेवण्यासाठी ऑफिस, मिटींग्ज, सभारंभाला जाताना परफ्युम वापरतो. त्यासाठी पर्समध्ये परफ्युमही ठेवतो, पण तुम्हाला माहीत आहे का की या परफ्युमचेही साईड इफेक्ट्स आहेत. परफ्युममुळे काहीजणांना एलर्जीसारखे त्रास होऊ शकतात, तर काहींना थेट प्रकृतीविषयक गंभीर समस्याही उद्भवू शकतात.**



परफ्युममध्ये प्रामुख्याने बेंजाईल अल्कोहोल, ॲसिटोन, इथेनॉल, एथिल एसीटेट, बेंजाल्डिहाईड, फार्मेल्डिहाईड, मेथॅनिल क्लोराईडबरोबरच लिमोनेन यासारख्या रसायनांचा वापर करण्यात येतो. या सुगंधी द्रव्यात फेथलेट्सचाही समावेश असतो. तसेच सगळ्याच सुगंधित परफ्युममध्ये एंडोक्राईन डिसपर्चर, कसिर्नोजेन बेंजोफेनोन आणि सायरिन या घातक केमिकल्सचाही वापर करण्यात येतो. या सर्व केमिकलयुक्त द्रव पदार्थांचा शरीरावर विपरित परिणाम होतो.

त्यामुळे बऱ्याचवेळा काहीजणांना परफ्युम लावल्याने त्रास होतो. यात प्रामुख्याने परफ्युमच्या सुगंधामुळे सुज येणे, गंभीर डोकेदुखी, यासह त्वचेच्या गंभीर समस्या निर्माण होतात. यात प्रामुख्याने त्वचेवर खाज येणे, भेगा पडणे, असा त्रास होतो, तर काहीजणांना त्वचेवर पुरळ येऊन अस्वस्थ वाटू लागते.

यामुळे परफ्युम वापरल्यानंतर जर तुम्हाला शिंका येत असतील, त्वचेवर जळजळ होत असेल, श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर परफ्युमचा वापर तातडीने थांबवावा. तसेच गरज पडल्यास ॲलर्जी एक्सपर्ट्सचा सल्ला घ्यावा. यामुळे पुढील अनर्थ टाळता येईल.

**Fashion**

# गोल्डन झुमक्याची ग्लोरी



**सध्या लग्नसराईचे दिवस सुरू आहेत. यामुळे या वेडींग सिझनमध्ये जर तुम्हाला हटके लूक हवा असेल, तर गोल्डन झुमके हे कोणत्याही साडीवर किंवा लेहंगा, हेवी ड्रेसवर शोभून दिसतात. सोनेरी झुमक्याचे नवीन प्रकारसुद्धा आता ट्रेंडिंगमध्ये आहेत.**

### गोल्ड प्लेटेड झुमके

गोल्ड प्लेटेड झुमक्यांची फॅशन खरंतर बाहुबली चित्रपटापासून आली. देवसेना या बाहुबली चित्रपटातील नायिकेने हे कानातले घातल्याचे दिसले तेव्हापासून हे डिझाईन ट्रेंडमध्ये आहे. यामध्ये आता बरेच प्रकार आले आहेत.

### गोल्ड टोन पीकॉक मोती झुमका

मोरांचं डिझाईन असलेले हे झुमके फारच सुंदर आहेत. यामध्ये तुम्हाला मल्टीकलर मोर झुमकेही बाजारात मिळतील. जर तुम्हाला हँगिंग कानातले आवडत असतील, तर असं डिझाईन तुमच्या ज्वेलरी बॉक्समध्ये असलंच पाहिजे. कोणत्याही साडीवर हे कानातले छानच दिसतात.

### टेम्पल डिझाईन झुमका

टेम्पल डिझाईनचा झुमका हा प्रत्येक सणाला ट्रेंडिंगमध्ये असतो. नेहमीच्या झुमक्याच्या डिझाईनपेक्षा हे झुमके वेगळे आहेत. तसेच जेव्हा लग्नात पेशवाई लूक तुम्ही करता तेव्हा तुम्ही टेम्पल डिझाईनचा झुमका घालू शकता. या झुमक्यामध्ये बारीक मंदिराच्या डिझाईन्स आणि हेव्ही डिझाईन्सदेखील तुम्हाला मिळतील.

### गोल्ड प्लेटेड कुंदन झुमके

लग्नसराईत कुंदन दागिन्यांना पर्याय नाही. झुमक्यांमधील हे अजून एक सुंदर डिझाईन आहे. ज्यामध्ये एक नाहीतर पाच छोटेछोटे झुमके आहेत. गोल्ड प्लेटेड कुंदन झुमके हे दिसायला तर रिच आहेतच, पण त्याची किंमतही अगदी बजेट फ्रेंडली आहे. तुम्हाला पहिल्यांदा पाहिल्यावर जरी हे कानातले महाग वाटले तरी तुमच्या बजेटमध्ये हे नक्कीच बसतील. अशातच तुम्हालाही गोल्ड प्लेटेड कुंदन झुमके आवडत असल्यास हे कानातले नक्की ट्राय करा.

### गोल्ड कंटेपररी झुमके

जर तुम्ही मॉर्डन झुमक्याच्या डिझाईनच्या शोधात असाल तर कंटेपररी झुमक्याची स्टाईल एकदा ट्राय करून बघा. हे झुमके गोल्ड प्लेटेड असून त्यावर आर्टिफिशियल स्टोन्सच्या डिझाईन्स असतात. तसेच हे कानातले तुमच्या ट्रेडीशनल कुर्ती किंवा कोणत्याही ट्रेंडी साडीवर अगदी उठून दिसतील.

# मुंबईत ४.३३ लाख मतदारांची अनेकदा नावे

## एकाच व्यक्तीचे नाव १०३ वेळा, त्यामुळे दुबार मतदारांची संख्या ११ लाखांवर

**मुंबई महापालिकेकडून दुबार मतदारांची शोधमोहीम, कृती आराखडा**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या अगोदरच प्रारूप मतदार यादीतील ११ लाख दुबार मतदारांच्या नावांमुळे निर्माण झालेला घोळ मुंबई महापालिकेच्या अंगाशी येणार आहे. हे लक्षात असल्याने आता मुंबई महापालिकेने प्रत्येक वार्डमध्ये जेथे जेथे दुबार नावे आढळून आली आहेत, ज्यांनी स्वतःहून ती सुधारित करून घेतलेली नाहीत त्यांचा घरोघरी शोध घेण्याची मोहीम युद्धपातळीवर हाती घेतली आहे. महापालिकेचे प्रतिनिधी झोपडपट्टीत, सोसायटीमध्ये दुबार मतदारांच्या नावांची यादी हातात घेऊन त्या मतदारांचा कडून शोध घेत आहेत. मात्र अनेक मतदारांचे घरचे पत्ते, स्थळ, चाळ, ठिकाण याबाबत नीटपणे माहिती न नोंदवली गेल्याने या पालिका प्रतिक्कनिधीना दुबार मतदारांचा शोध घेण्यात मोठी अडचण येत असल्याचे निदर्शनास येत आहे. मुंबईत प्रारूप मतदार यादीत दुबार मतदारांची संख्या ११ लाखांवर गेली आहे. यामध्ये प्रत्यक्षात ४ लाख ३३ हजार मतदारांची नावे ही दोन , चार, आठ, दहा अधिकतर १०३ वेळा पर्यंत नोंदवली गेल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या दुबार मतदारांना फक्त एकदाच मतदान करता यावे, त्यापेक्षा अधिक वेळा त्यांना मतदान करता येऊ नये यासाठी महापालिका, निवडणूक विभागाने एक कृती आराखडा तयार केला आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मुंबई महापालिकेची निवडणूक जानेवारी महिन्यात घेण्यात येणार आहे. मात्र अद्यापही प्रारूप मतदार यादीतील दुबार मतदारांचा घोळ काही सुटलेला दिसत नाही. महापालिका १ जुलै २०२५ रोजीपर्यंत नोंदविण्यात आलेल्या मतदारांच्या यादीनुसार मतदान घेण्याचे ठरले आहे. त्यानुसार एकूण मतदारांची संख्या ही १ कोटी ३ लाख ४३ हजार २१६ एवढी नोंदवण्यात आलेली आहे. मात्र या यादीत तब्बल ११ लाख १ हजार ५०५ नावे ही दुबार आहेत. विशेष म्हणजे जवळजवळ ४ लाख ३३ हजार मतदारांची नावे ही अनेकदा नोंदवण्यात आलेली आहेत. आणखीन कहर म्हणजे एकाच व्यक्तीचे नाव महापालिकेच्या निवडणुकीच्या इतिहासात तब्बल १०३ वेळा नोंदविण्यात आल्याचा जागतिक विक्रम झाला आहे. त्यामुळेच ही दुबार नावे वगळण्याची मागणी विरोधी पक्षांनी वारंवार लावून धरली आहे. सुधारित मतदार यादी तयार करून मगच निवडणूक घ्यावी, अन्यथा निवडणूक घेऊ नये, अशा शब्दांत विरोधकांनी निवडणूक आयोगाला सुनावले आहे. तर दुसरीकडे दुबार मतदारांबाबत मुंबई महापालिका आयुक्तांकडे तक्रार करावी आणि त्यांच्याकडे दाद मागावी, असे सांगत निवडणूक आयोगाने आपले हात वर केला आहे. मात्र मुंबई महापालिकेने निवडणूक आयोगाने प्रारूप मतदार यादी १४ नोव्हेंबर ऐवजी २० नोव्हेंबरला पाठवली असल्याचे सांगत निवडणूक आयोगाकडे बोट दाखवले आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत दुबार मतदारांमुळे मोठा पेचप्रसंग ओढवला आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत प्रारूप मतदारयादीत एकूण मतदारांची संख्या १ कोटी ३ लाख ४३ हजार २१६ इतकी नोंदविण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात ४ लाख ३३ हजार दुबार मतदारांमुळे ही संख्या वाढली असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे दुबार मतदारांची नावे वगळली गेल्यास प्रत्यक्षात मतदारांची संख्या ही ९९ लाख १० हजारावर येण्याची शक्यता आहे.

**सर्वाधिक कमी दुबार मतदारांची संख्या असलेले प्रभाग :**

● **वॉर्ड प्रभाग दुबार नावे**

- आर/उत्तर १ – २१४२
- जी/उत्तर १८७ – २४२६
- एफ/उत्तर १७४ – २५४४
- जी/उत्तर १८३ – २६११
- एम /पूर्व १३६ – २७३०

**सर्वाधिक जास्त दुबार मतदारांची संख्या असलेले प्रभाग :**

● **वॉर्ड प्रभाग दुबार नावे**

- जी/दक्षिण १९९ – ८२०७
- एफ/दक्षिण २०३ – ७६२४
- जी/दक्षिण १९४ – ७५८४
- एफ/दक्षिण २०५ – ७५८५
- एफ/दक्षिण २०२ – ७४७०
- एफ/दक्षिण २०४ – ७३८२
- के/पश्चिम ६६ – ७३८६



**तीन निवडणूक मतदार यादीतील मतदारांची संख्या, महिला,पुरुष, इतर व त्यातील फरक**

- २०१२ च्या निवडणुकीत एकूण मतदारांची संख्या १ कोटी २ लाख ८६ हजार ५७९ एवढी होती. त्यामध्ये , पुरुष मतदारांची संख्या ५७ लाख २० हजार ३०६ एवढी होती. तर महिला मतदारांची संख्या ४५ लाख ६६ हजार २७३ एवढी होती.
- २०१७ च्या निवडणुकीत एकूण मतदारांची संख्या ९१ लाख ८० हजार ४९७ एवढी होती. त्यामध्ये , पुरुष मतदारांची संख्या ५० लाख ३० हजार ३६३ एवढी होती. तर महिला मतदारांची संख्या ४१ लाख ४९ हजार ७५३ आणि इतर ३८१ एवढी होती.
- २०२५ च्या निवडणुकीत प्रारूप मतदारयादीत एकूण मतदारांची संख्या १ कोटी ०३ लाख ४३ हजार २१६ एवढी दर्शविण्यात त्यामध्ये , पुरुष मतदारांची संख्या ५५ लाख १६ हजार ७०७ एवढी असून महिला मतदारांची संख्या ४८ लाख २६ हजार ५०९ आणि इतर १०९९ एवढी दर्शविण्यात आली आहे.

# प्रारुप मतदार यादीबाबत हरकती आणि सूचना देताना पुरावा देण्याची गरज नाही : मुंबई महापालिका

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिका निवडणूक तोंडावर आलेली असताना प्रारूप मतदार यादीत ११ लाखांपेक्षाही जास्त दुबार मतदारांची नावे आढळून आल्याने विरोधकांनी रान उठवले आहे. त्यामुळे त्याची गंभीर दखल पालिकेला घ्यावी लागली आहे. मात्र आता पालिकेने हरकती व सूचना देताना पुरावा सादर करण्याचीही गरज नाही, असे म्हटले आहे.

मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, प्रारुप मतदार यादीबाबत हरकती व सूचना सादर करण्यासाठी आता कोणतेही निर्बंध नाहीत. तसेच, हरकती व सूचना देताना पुरावा सादर करण्याचीही गरज नाही. मुंबई महापालिकेचे संबंधित प्राधिकृत अधिकारी स्वतःहून दखल घेऊन प्रशासकीय यंत्रणेद्वारा शहानिशा करून याबाबत यथोचित निर्णय घेतील, असे आश्वासन पालिकेतर्फे देण्यात आले आहे. तसेच, मुंबई महापालिकेच्या https://www.mcgm.gov.in/ या संकेतस्थळावर 'सूचना व अद्यतने' या टॅब अंतर्गत 'निवडणूक प्रभागांच्या मतदार यादीत आपले नाव शोधा' ही लिंक उपलब्ध केली असून या लिंकवर क्लिक केल्यानंतर https://mahasecvoterlist.in/ या संकेतस्थळावर जाऊन मतदारांना त्यांचे मतदार यादीतील नाव शोधता येईल.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांमध्ये नमूद केले आहे की, प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केल्यानंतर जर त्यात काही लेखनिकांच्या चुका, दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकुन अंतर्भूत झाले आणि १ जुलै २०२५ च्या विधानसभा मतदार यादीत नावे असूनही संबंधित प्रभागात नाव समाविष्ट झाली नाहीत, अशा बाबी स्वतःहून अथवा अन्य मार्गाने निदर्शनास आणण्यात आल्यास त्याची तत्काळ दखल घेऊन अंतिम मतदार यादी तयार करताना त्या चुकांची दुरुस्ती करावी. संबंधित मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झाले आहेत किंवा कसे याची तपासणी करावी. जर मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाले असतील, तर त्या मतदारांना योग्य प्रभागात समाविष्ट करावेत आणि अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध कराव्यात, असे या निर्देशांमध्ये नमूद केले आहे. यानुसार, महापालिकेच्या वतीने कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

पालिकेने म्हटले की, मतदारांच्या सोईसाठी महापालिका मुख्यालय तसेच २४ प्रशासकीय विभाग (वॉर्ड) कार्यालयांमध्ये मतदार सहायता केंद्र (हेल्प डेस्क) सुरू करण्यात येणार असल्याचे पालिकेने म्हटले आहे. याशिवाय संभाव्य दुबार मतदारांबाबतही प्रत्येक सहायता केंद्रात माहिती देण्यात येईल. तसेच, दुबार मतदारांशी निवडणूक अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून संवाद साधला जाईल. तथापि, मतदार केंद्रनिहाय यादी तयार होईपर्यंत दुबार मतदारांबाबतची विहित प्रक्रिया केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात येत आहे.

# राज्यात औषध संशोधन केंद्राची उभारणी

## गुजरात, आंध्र प्रदेशच्या धर्तीवर सुविधा उभारण्याचा राज्य सरकारचा निर्णय

■**मुंबई। प्रतिनिधी,**

आरोग्य विज्ञानासाठी जैवतंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरत असून औषध क्षेत्रातील अशा नावीन्यपूर्ण संशोधन आणि विकासासाठी (लाइफ सायन्सेस इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर) सुविधासंपन्न भव्य केंद्र उभारण्यासाठी कार्यवाही केली जाईल. गुजरात व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर औषध संशोधन केंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रोजगार निर्मिती, जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी संशोधन केंद्राची गरज आहे. हे इनोव्हेशन पार्क निर्माण होणे हे काळाची गरज असून याच्या उभारणीतून महाराष्ट्र हा नावीन्यपूर्ण औषध निर्मिती क्षेत्रात आघाडीवर राहील, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले.

मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीसाठी अन्न व औषध प्रशासन विभागातील सहआयुक्त (दक्षता) डॉ. राहुल खाडे, सहआयुक्त (औषधे) दा. रा. गहाणे, गिरीश हुकरे, व्ही. टी. जाधव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. "औषध निर्मिती क्षेत्रातील कंपन्या यासाठी कामे करत असून त्यास मयार्दा आहेत. अशी संशोधन केंद्रे सुरू केली जात आहेत. गुजरात, आंध्र प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या ठिकाणी असे संशोधन केंद्र उभे राहत असून औषधे गोळ्या, कॅप्सूल इत्यादींच्या विकासासाठी, जैविक व रासायनिक संशोधनासाठी फॉम्युर्लेशन लॅबचे सार्वजनिक–खासगी भागीदारीतून देखील उभारणी केली जात आहे. या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे. या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे औषध, बायोटेक, मेडिकल उपकरणे, डायग्नोस्टिक्स आणि डिजिटल हेल्थ या क्षेत्रांतील नावीन्यपूर्ण स्टार्टअप्सना आधुनिक सुविधा, तांत्रिक मार्गदर्शन तसेच निधी उपलब्ध होईल. यातून राज्यातील औषधनिर्मिती उद्योगक्षेत्रात गुंतवणूक वाढ होईल. स्टार्टअप्सना मार्गदर्शन, प्रशिक्षण सुविधा, रोजगार निर्मिती, जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी परिपूर्ण संशोधन संस्था म्हणून काम करेल," असे झिरवाळ यांनी सांगितले.



यावेळी या बैठकीत अन्नसुरक्षा अधिकारी, गुण नियंत्रण व दक्षता शाखेचे अधिकारी उपस्थित होते. हे इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर राज्यातील आरोग्य, औषधनिर्मिती व बायोटेक क्षेत्रातील नावीन्याचा जागतिक केंद्रबिंदू बनण्यास मोठी गती मिळेल. मार्गदर्शनाखाली हे केंद्र राज्याला स्पर्धात्मक लाभ मिळेल, नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळणार आहे, असेही झिरवाळ यांनी सांगितले.

# बोगस जन्म-मृत्यू दाखले रद्द करा

## महसूल मंत्र्यांचे आदेश, दाखल्यांच्या नोंदणीबाबत मार्गदर्शक सूचना जारी, 'ही' शहरे रडारवर!

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात बेकायदेशीर पद्धतीने व खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळविलेल्या जन्म-मृत्यू दाखल्यांचे रॅकेट मोडून काढण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कंबर कसली असून, केवळ आधारकार्डच्या पुराव्यावर दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करून, पोलिसांत तातडीने तक्रार दाखल करण्याचे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.



याबाबतचे परिपत्रक गुरुवारी महसूल विभागाने जारी केले असून तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना १६ मुद्द्यांच्या आधारे जन्म-मृत्यू दाखल्याची तपासणी करावी, असे सुचविण्यात आले आहे. अतिरिक्त मुख्य सचिव गृह व अतिरिक्त मुख्य सचिव महसूल यांच्या उच्चस्तरीय बैठकीतील सूचनानंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आदेश दिले.

"मुळात जन्म-मृत्यूचे दाखले देण्यासाठी आरोग्य विभागाची यंत्रणा आहे. मात्र एक वर्षे उलटून गेल्यावर हे दाखले महसूल विभागामार्फत दिले जातात. त्यासाठी तहसीलदार व त्यावरील अधिकारी सक्षम आहेत. मात्र, अनेक ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे बरेच गैरप्रकार झाल्याचे आढळून आले. त्यामुळे आता प्रमाणपत्र परत घेणे किंवा त्यांची फेरतपासणी करण्याचे निश्चित केले आहे," असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

**खोट्या नोंदी आढळल्यास थेट गुन्हा दाखल**

अर्जातील माहिती आणि आधारकार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच, जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी बनवून त्यांना 'फरार' घोषित करणार असून त्यांच्यावर स्थानिक पोलिसांत एफआयआर दाखल करण्यात येणार आहे.

**'या' तारखेनंतरचे आदेश रद्द होणार**

११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरित केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधारकार्डला पुरावा मानून जन्म-मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. आधार कार्ड हा जन्माचा किंवा जन्म ठिकाणाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही, असे महसूल विभागाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचा हवाला देऊन स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली विशेष मोहीम राबवून विशेष मेळाव्याद्वारे या कामाचा निपटारा केला जावा असे बजावण्यात आले आहे.

**राज्यातील 'ही' शहरे रडारवर!**

अवैध जन्म-मृत्यू प्रकरणांमध्ये राज्यातील काही विशिष्ट शहरे आणि तालुके 'हॉटस्पॉट' असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये अमरावती, सिल्लोड, अकोला, संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अधार्पूर आणि परळी या ठिकाणांचा समावेश असून, येथील तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना ही प्रकरणे गांभीयार्ने तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**यामुळे रद्द होणार!**

- केवळ 'आधार कार्ड'वर मिळालेले जन्म दाखले रद्द होणार.
- जन्मतारखेत तफावत आढळल्यास थेट पोलिसात तक्रार.
- बनावट प्रमाणपत्र घेणारे लाभार्थी पळून गेल्यास त्यांना 'फरार' घोषित करणार.
- संभाजीनगर, अमरावती, लातूरसह १४ ठिकाणी विशेष तपास मोहीम.

# बेस्टमध्ये कर्मचाऱ्यांच्या पात्र १८ वारसांची 'सफाईगार' पदावर नियुक्ती



■**मुंबई। प्रतिनिधी,**

बेस्ट उपक्रमांत काम केलेल्या कर्मचाऱ्यांच्या १८ पात्र वारसदारांची 'सफाईगार' पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बेस्ट उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून कोट्यवधी रुपयांनी तोट्यात सुरू आहे. मुंबई महापालिकेकडून देण्यात येत असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक मदतीवर बेस्ट उपक्रमाची गाडी कशीतरी चालत आहे. बेस्ट उपक्रमाला तोट्यामधून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन आणि मुंबई महापालिका यांच्या शिफारशीनुसार भाडे तत्वावरील बसगाड्या बेस्टच्या बस ताफ्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मात्र तरीही बेस्ट उपक्रमाचा तोटा काही भरून निघत नाही.

बेस्टला कर्मचाऱ्यांना मासिक वेतन देण्यासाठी देखील अडचण येत आहे. त्यामुळेच बेस्ट उपक्रमाने बेस्टमध्ये नवीन भरती केलेली नाही. मात्र बेस्ट उपक्रमात सफाई कामगार म्हणून काम केलेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र १८ वारसांची लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार 'वारसा हक्क' अंतर्गत बेस्ट उपक्रमाच्या सेवेमध्ये २७ नोव्हेंबर २०२५ पासून 'सफाईगार' या पदावर नियुक्ती करण्यात आली. या १८ जणांना बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक डॉ. सोनिया सेठी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली.

**तबेल्यांचा प्रश्न दशकानुदशके रखडलेला**

माथेरानमध्ये तबेल्यांचा प्रश्न दशकानुदशके रखडलेला आहे. मागील ४० वर्षांत एकही नवीन तबेला बांधून देण्यात आलेला नाही, हे कटू वास्तव घोडेवाल्यांकडून पुन्हा एकदा समोर आले आहे. माथेरानमध्ये ह्यई-रिक्षाह्ल हा मुद्दा जसा केंद्रस्थानी आला आहे, तसा घोडेवाल्यांचा विश्वास जिंकणे ही सर्वच पक्षांसाठी मोठी कसोटी ठरणार आहे. पर्यटकांची सोय, पर्यावरणाचा समतोल आणि घोडेवाल्यांचे अस्तित्व यांचा समन्वय साधत पुढील धोरण कोण आखते, याकडे संपूर्ण माथेरानचे लक्ष लागले आहे.

# माथेरान निवडणुकीत ई-रिक्षा विरुद्ध घोडेवाले रंगणार

## व्यावसायिकांचे हित आणि पर्यावरण यांची परीक्षा

■**माथेरान। प्रतिनिधी,**

माथेरान नगरपरिषदेची निवडणूक अंतिम टप्प्यात पोहचली असून प्रचाराला चांगला जोर चढला आहे. महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई आणि खासदार सुनील तटकरे यांच्या सभा एकाच दिवशी झाल्याने राजकीय वातावरण आणखी तापले. मतदारांना आकर्षित करणारी आश्वासने आणि मोठमोठे मुद्दे चर्चेत असताना ई-रिक्षा सुरू करण्याचा निर्णय आणि घोडेवाल्यांच्या हितरक्षणाचा प्रश्न हे या निवडणुकीतील महत्त्वाचे मुद्दे ठरत आहेत.

पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सभेत स्पष्ट केले की, सुप्रीम कोटार्ने ई-रिक्षाबाबत दिलेल्या आदेशाची राज्य सरकार तत्काळ अंमलबजावणी करील. तसेच ई-रिक्षा स्वतः राज्य सरकारच खरेदी करणार असून त्यामुळे घोडेवाले किंवा अश्वचालकांच्या व्यवसायावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, अशी हमी त्यांनी दिली.





दरम्यान, शिवराष्ट्र पॅनलच्या सभेत खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, ई-रिक्षा सुरू झाल्यामुळे पर्यटकांची पायपीट कमी झाली आणि वाहतूक व्यवस्थेत सकारात्मक बदल झाला आहे. यामुळे पर्यटन वाढीस चालना मिळेल. मात्र, ई-रिक्षा पॉइंटवर जाणार नसल्याने अश्वचालकांचा व्यवसाय घटण्याऐवजी उलट वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माथेरानमध्ये अश्वचालकांची मतदारसंख्या मोठी असल्याने सर्व राजकीय पक्ष निवडणूक काळातच त्यांच्या सुखदु:खात सामील होतात, अशी भावना घोडेवाल्यांमध्ये आहे. "निवडणूक आली की आठवण; संपली की विसर," अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

शिवसेना–भाजप युतीने मात्र सुरुवातीपासूनच ई-रिक्षाबाबत आपली भूमिका स्पष्ट ठेवली आहे. अश्वचालकांवर कोणताही अन्याय होणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली असून याचे प्रतिबिंब निवडणूक प्रचारात दिसून येत आहे.

# कल्याण-डोंबिवलीत ९ तास पाणीपुरवठा बंद

## साठा करून ठेवण्याचे महापालिकेचे आवाहन

■**कल्याण। प्रतिनिधी,**

केडीएमसी महानगरपालिकेने नागरिकांना पूर्वतयारी म्हणून पुरेसा पाणी साठा करून ठेवण्याचे आवाहन केले आहे. दुरुस्तीची कामे सुरळीत व नियोजित वेळेत पार पडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, अशी विनंती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केली आहे. कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली उदंचन केंद्रामधून उल्हास नदीतून उचललेले पाणी नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून डोंबिवली पूर्व व पश्चिम भागात पुरवठा केला जातो.

या उदंचन केंद्रातील तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत व यांत्रिकी उपकरणांच्या दुरुस्तीची अत्यावश्यक कामे हाती घेण्यात येत आहेत. त्याचबरोबर डोंबिवली विभागाच्या वितरण व्यवस्थेतील देखभाल व दुरुस्तीची कामेही करण्यात येणार आहेत.



त्यामुळे मंगळवार, २ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत (एकूण ९ तास) नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रामधून डोंबिवली पूर्व व पश्चिम विभागांचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद (शटडाऊन) राहणार आहे. महानगरपालिकेने नागरिकांना पूर्वतयारी म्हणून पुरेसा पाणी साठा करून ठेवण्याचे आवाहन केले आहे. दुरुस्तीची कामे सुरळीत व नियोजित वेळेत पार पडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, अशी विनंती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com